**<u>ठळक बातम्या</u>**

- जनतेचा पैसा जनतेच्या, देशाच्या विकासावर प्रामाणिकपणे खर्च करण्याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- कृषी उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि किरकोळ विक्री भावातली तफावत कमी करण्यासाठी केंद्र सरकार समिती स्थापन करणार

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारत पराभूत

**<><><><><>**

जनतेचा पैसा जनतेच्या, देशाच्या विकासावर खर्च व्हावा, याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशात वाराणसी इथं ६ हजार ७०० कोटी रुपयांच्या २३ विविध विकास प्रकल्पाचं उद्घाटन आणि पायाभरणी केली, त्यावेळी ते बोलत होते. पायाभूत सुविधांमुळे नागरिकांचं जीवन सुलभ होण्यासोबतच रोजगारनिर्मिती होते, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

- **बाईट -प्रधानमंत्री (२६ सेकंद )**

जेव्हा महिला आणि युवा सक्षम होतात, तेव्हाच समाजाचा विकास होतो, असं प्रधानमंत्री म्हणाले. शिक्षण, कौशल्य विकास, खेळ, पर्यटन, आरोग्य असे अनेक

प्रकल्प आज काशीला लाभले आहेत. काशी आणि पूर्वांचल व्यापाराचं मोठं केंद्र व्हावं, यासाठी सरकार प्रयत्न करत आहे असं त्यांनी सांगितलं. वाराणसी इथं आर. जे. शंकर नेत्र रुग्णालयाचं उद्घाटनही आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. स्वच्छता, पोषण आहार, लसीकरण यावर सरकार देत असलेला भर यावेळी प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केला. उपचारासाठी मुंबई-दिल्लीसारख्या मोठ्या शहरांवरचं अवलंबित्व कमी व्हावं यासाठी दशकभरात लहान शहरांमध्ये आरोग्य सुविधा वाढवल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमानंतर मोदी यांनी वाराणसी इथं रोड शो केला.

<><><><><>

कृषी उत्पादनं आणि बागायती उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि या उत्पादनांची बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी सरकार एक समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत कृषी परिषदेत बोलत होते. शेतकरी आपला भाजीपाला ५ रुपये किलो भावानं विकतात आणि किरकोळ बाजारात मात्र तो ५० रुपये किलो भावानं विकला जातो, ही तफावत कमी करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचं काम ही समिती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. कृषी संशोधनाचे फायदे प्रयोगशाळेपासून शेतापर्यंत पोहचवण्यासाठी पुढच्या महिन्यापासून ‘कृषी चौपाल’ उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

खेलो इंडिया अस्मिता साखळी स्पर्धांमुळे राष्ट्रीय स्पर्धांमधला महिलांचा सहभाग वाढला आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी काढले. तिरुअनंतपुरम इथं भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रादेशिक केंद्रा अंतर्गत

एका महाविद्यालयाच्या वसतिगृहाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. पदक जिंकल्यानं फक्त त्या खेळाडू आणि त्याच्या प्रियजनांचाच सन्मान होत नसून संपूर्ण देशाचा सन्मान होतो असं ते म्हणाले. २०३६ साली होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या पदकतालिकेत पहिल्या १० मध्ये स्थान मिळवण्याचं भारताचं लक्ष असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेअंतर्गत यावर्षीच्या ऑगस्ट महिन्यात १८ लाख ५३ हजार निव्वळ सदस्य जोडले गेले आहेत अशी माहिती कामगार आणि रोजगार मंत्रालयानं निवेदनाद्वारे दिली आहे. या महिनाभराच्या काळात सुमारे नऊ लाख ३० हजार नवीन सदस्यांनी नोंदणी केली आहे. एकूण नव्या सदस्यांपैकी अडीच लाखापेक्षा जास्त सदस्य महिला आहेत असंही मंत्रालयानं कळवलं आहे. रोजगाराच्या वाढत्या संधी, कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांविषयी वाढलेली जागरूकता आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या प्रचार प्रसाराच्या यशस्वी उपक्रमांमुळे ही सदस्यसंख्या वाढली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. ही आकडेवारी म्हणजे रोजगाराच्या संधी वाढल्या असल्याचेच संकेत आहेत, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

काश्मीर खोऱ्यात बारामुल्ला जिल्ह्याच्या उरी भागातल्या नियंत्रण रेषेजवळ सुरक्षा दलं आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. श्रीनगरमधे नियुक्त लष्कराच्या चिनार तुकडीनं याबाबतचं वृत्त समाजमाध्यमांवर टाकलं आहे. या भागात सुरक्षा दलांना घुसखोरी होत असल्याच्या संशयास्पद हालचाली दिसल्या होत्या. त्यानंतर ही घुसखोरी रोखण्यासाठी लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त मोहीम सुरू केली. ही मोहीम सुरु असतानाच दहशतवाद्यांनी अंदाधुंद

गोळीबार केला, सुरक्षा दलानंही त्याला चोख प्रत्यूत्तर दिलं. शेवटचं वृत्त हाती येईपर्यंत ही चकमक सुरुच होती.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं ९९ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून तर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठीतून उमेदवारी दिली आहे. मंत्री गिरीश महाजन जामनेरमधून तर सुधीर मुनगंटीवार बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवतील. वांद्रे पश्चिम मधून आशीष शेलार, मलबार हिलमधून मंगल प्रभात लोढा, कुलाब्यातून राहुल नार्वेकर आणि भोकर विधानसभा मतदारसंघातून श्रीजया अशोक चव्हाण उमेदवार असतील. नाशिक पूर्वमधून राहुल ढिकले तर नाशिक पश्चिमला सीमा हिरे यांना उमेदवारी दिली आहे. सोलापूर शहर उत्तरमधून विजयकुमार देशमुख आणि सोलापूर दक्षिणमधून सुभाष देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. श्रीगोंद्यातून प्रतिभा पाचपुते, देवळीतून राजेश बकाणे, चिंचवडमधून शंकर जगताप, फुलंब्रीतून अनुराधा चव्हाण, इचलकरंजीतून राहुल आवाडे, केजमधून नमिता मुंदडा  यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत ज्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता आहे, तिथं उमेदवार उभे करावेत, तसंच इतर ठिकाणी मराठा आरक्षणाला समर्थन देणाऱ्याला मतदान करावं, असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी केलं. जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथं सभेत ते आज बोलत होते. कोणत्या मतदारसंघात मराठा समाजाची ताकद आहे, हे तपासणं गरजेचं आहे, असं जरांगे यावेळी म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रात आचारसंहिता लागू झाल्यापासून सी व्हिजिल या ॲपवर आतापर्यंत ५७६ तक्रारी आल्या असून त्यातल्या ५६३ तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी दिली. आचारसंहिता लागू झाल्यानंतर शासकीय, सार्वजनिक, खासगी जागेतल्या विनापरवानगी लावलेल्या जवळपास सात लाख जाहिराती काढल्या, तसंच बेकायदेशीर पैसे, दारू, अंमली पदार्थ इत्यादी मिळून १४ कोटी ९० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचं कुलकर्णी यांनी सांगितलं.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांमध्ये जागावाटप करण्याआधी आपल्या पक्षाला विचारात घेतलं नाही, असं राष्ट्रीय जनता दलाचे नेते मनोज कुमार झा यांनी म्हटलं आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस ७० जागांवर तर राजद आणि मार्क्सवादी लेनिनवादी कम्युनिस्ट पक्ष ११ जागांवर लढणार असल्याचं काल झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी जाहीर केलं होतं. त्यावर राजदनं नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, जागावाटप निश्चित करण्याआधी इंडिया आघाडीतल्या सर्व पक्षांशी चर्चा केली होती, असं स्पष्टीकरण काँग्रेस नेते राजेश ठाकुर यांनी दिलं आहे.

<><><><><>

झारखंड निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू झाल्यापासून झारखंडच्या विविध भागातून आतापर्यंत अवैध वस्तू आणि रोख रकमेच्या स्वरुपात सुमारे ३ कोटी १५ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक

अधिकारी के रवीकुमार यांनी अधिकाऱ्यांना आचारसंहितेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

भारत आणि न्यूझिलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडनं आज भारताचा आठ गडी राखून पराभव करत मालिकेत १-० नं आघाडी घेतली. भारताचा दुसरा डाव काल ४६२ धावांवर संपल्यानंतर न्यूझीलंडसमोर विजयासाठी १०७ धावांचं लक्ष्य होतं. २ गड्यांच्या मोबदल्यात न्यूझीलंडनं हे लक्ष्य पार केलं.  भारतातर्फे जसप्रीत बुमराहने न्युझिलंडचा कर्णधार टॉम लॅथमला शून्यावर तंबुत धाडलं. तर डेवन कॉन्वे याला १७ धावांवर बाद केलं. मात्र विल यंग याच्या नाबाद ४८ आणि राचीन रविंद्रच्या नाबाद ३९ धावांनी संघाची धावसंख्या ११० वर पोहोचवली.

<><><><><>

महिला क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना न्युझिलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझिलंडच्या दोन गड्यांच्या बदल्यात ६२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

इस्रायलनं गाझाच्या उत्तर भागातल्या बेत लाहिया परिसरात केलेल्या हल्ल्यात ८७ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. ढिगाऱ्याखाली आणखी काही जण गाडले गेल्याची भीती व्यक्त होत आहे. मदत आणि बचावकार्य सुरू असल्याची माहिती गाझा सरकारच्या माध्यम कार्यालयानं दिली आहे.

**<><><><><>**

इंडोनेशियाचे नवे राष्ट्रपती म्हणून प्राबोवो सुबियांतो यांनी पदभार स्वीकारला आहे. इंडोनेशिया जगातली तिसरी मोठी लोकशाही असून ७३ वर्षांचे प्राबोवो सुबियांतो इंडोनेशियाचे आठवे राष्ट्रपती बनले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात परतीच्या पावसानं जोर धरला असून अनेक जिल्ह्यात पिकांचं नुकसान झालं आहे. **अमरावती** जिल्ह्यात कालपासून झालेल्या पावसामुळे शेतात असलेल्या सोयाबिनला त्याचा फटका बसला आहे. **जालना** जिल्ह्यातल्या परतूर तालुक्यात निम्न दुधना प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु आहे. **रत्नागिरीत** काल घेतलेल्या विश्रांती नंतर आज दुपारनंतर पुन्हा विजांच्या कडकडाटासह पावसानं हजेरी लावली.

**//<><><><><>//**